# प्रकरण दुसरे

## " रानखळगी " आणि " पाणघळी " कादंब-यातील

## जीवनचित्रण

प्रास्ताविक :

भीमराव वाघचौरे यांच्या " रानखळगी " आणि " पाणघळी" या कादंब-यामधून जीवनचित्रण कशाप्रकारे व्यक्त झाले आहे याची चर्चा प्रस्तुत प्रकरणात करावयाची आहे. १९७२-७३ साली महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळामुळे अनेक शेतकरी कुटुंबाची पडझड झाली. अशाच एका कुटुंबातील मुलाची-दामाची " रानखळगी " ही कथा आहे. दुष्काळाने घराची वाताहात झालेली. आई बापाचा संसार मोडून पडलेला पण तरीही शिक्षण घेण्यासाठी धडपड करणा-या दामाची परवड कशाप्रकारे झाली याचेच चित्रण या कादंबरीत आलेले आहे. आर्थिक व सामाजिक बाबतीत मागास असलेला एक दलितेतर वर्ग समाजात आहे. त्या वर्गाला कुठलीही सवलत मिळत नाही फक्त नावालाच त्यांची जात व कुळ मोठे असते अशाच एका शेतकरी कुटुंबाच्या फाटत चाललेल्या संसारात दामा आपल्या हिमतीच्या जोरावर शिक्षण घेतो. शिक्षण घेत असताना दामाची कशाप्रकारे परवड झाली याचे चित्रण " रानखळगी " या कादंबरीमध्ये येते तर भीमराव वाघचौरे यांची दुसरी कादंबरी " पाणघळी " या कादंबरीमधून ग्रामीण भागातील छोटे शेतकरी, शेतमजूर यांच्या कष्टांचे प्रातिनिधिक स्वरूपाचे चित्रण आले आहे. पारंपारिक समाजव्यवस्था, निष्ठा आणि दुःखद दारिद्र्य व आकाराला येऊ लागलेली नवी मूल्यव्यवस्था यातील ताणातणावाचे प्रत्ययकारी चित्रण " पाणघळी " या कादंबरीमध्ये आले आहे. या दोन्ही कादंब-यामधून ग्रामीण लोकांचे दुःख, दारिद्र्य लोकांची मानसिकता, ग्रामीण लोकांचे आचारविचार, रूढी, परंपरा, संकेत, ग्रामीण लोकांची भाषा, निसर्ग, त्यांचे नाते-संबंध, परस्पर संघर्ष इ. गोष्टीचे चित्रण खूपच प्रभावीपणे व्यक्त झाले आहे.

कुटुंबाचे चित्रण :

" रानखळगी " व " पाणथळी " या दोन्ही कादंब-यातून कौटुंबिक पातळीवरचे चित्रण चांगल्याप्रमाणे रेखाटले आहे. "रानखळगी" कादंबरीतील दामाचे कुटुंब दुष्काळाच्या अगोदर चांगल खात पित असते पण दुष्काळानंतर मात्र त्याच्या कुटुंबाची खूपच वाताहात होते. दामाच्या कुटुंबात त्याचे आई, वडील, भाऊ, बहीण, आजी असं भरलेलं व नादतं घर आहे. दामा या कादंबरीचा नायक आहे. शेताच्या छोटयाशा तुकडयात दिवस-रात्र कष्ट करणे आणि आपला संसार चालविणे हेच या कुटुंबाचे जीवन आहे. शेतात कष्ट करायचे आणि दामाला शिकवायचे ही धडपड दामाच्या कुटुंबाची दिसून येते. दुष्काळाने दामाच्या कुटुंबावर संकट येते. चांगल्या सुखी कुटुंबाची पडझड सुरु होते. कष्ट, उपासमार, स्थलांतर, संकटे यांची एक मालिकाच दामाच्या कुटुंबाच्या वाटयाला येते. अशा दुःखद व कष्टदायक परिस्थितीमध्ये सुध्दा दामा शिकत राहतो. ग्रामीण जीवनातील कष्टदायक जीवनाचे चित्रण या कादंबरीत आले आहे.

". पाणथळी " या कादंबरीचा नायक " भगा " आहे. बापाच्या अपघाती निधनानंतर भगावर कुटुंबाची सर्व जबाबदारी येते. भगाच्या कुटुंबामध्ये त्याचे दोन लहान भाऊ जगू व दिना, बहीण शांती व पत्नी परभा या व्यक्ती आहेत. दारिद्रयाने गांजलेल्या भगाच्या शेतमजूराच्या एकूणच आयुष्यातील उन्हाळा चित्रित करताना लेखकाने वातावरणीय प्रतिकात्मकतेचा प्रभावीपणे वापर केला आहे. बापाच्या अकाली मृत्यूने भगावर कुटुंबाची जबाबदारी येते. दोन्ही भावांची शिक्षणे करणे, बहिणीचे लग्न करणे या जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी तो रात्रं-दिवस कष्ट करतो याचेच चित्रण या कादंबरीत आले आहे.

" पाणाडळी " या कादंबरीचा नायक " भगा" आहे. बापाच्या अपघाती निधनानंतर भगावर कुटुंबाची सर्व जबाबदारी येते. भगाच्या कुटुंबामध्ये त्याचे दोन लहान भाऊ जगू व दिना, बहीण शांती व पत्नी परभा या व्यक्ती आहेत. दारिद्र्याने गांजलेल्या भगाच्या शेतमजूराच्या एकूणच आयुष्यातील उन्हाळा चित्रित करताना लेखकाने वातावरणीय प्रतिकात्मकतेचा प्रभावीपणे वापर केला आहे. बापाच्या अकाली मृत्यूने भगावर कुटुंबाची जबाबदारी येते. दोन्ही भावांची शिक्षण करणे, बहिणीचे लग्न करणे या जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी तो रात्रं-दिवस कष्ट करतो याचेच चित्रण या कादंबरीत आले आहे.

या दोन्ही कादंब-यातील कुटुंबाची पार्श्वभूमी ही ग्रामीण आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी-शेतमजूर यांच्या वाटयाला येणारे दुःख, दारिद्र्य, कष्ट, उपासमार, हे यांच्यापण वाटयाला येते. " रानखळगी " या कादंबरीमध्ये कुटुंबातील व्यक्तींचे परस्पर संबंध फारच आपुलकीचे आणि प्रेमळपणाचे आहेत. आजी-आई यांच्या संघर्षाचे चित्रण येते पण तो संघर्ष निसर्गाशीच असलेला दिसतो. दामावरती त्याच्या कुटुंबातील सर्वजण खूप प्रेम करतात. त्याने शिकावे अशी सर्वांची तळमळ आहे दामाचे वडील म्हणतात, " आये आपल्या माघच्या पीढयाला कवा शाळा म्हायती व्हती का ग ? न्हवती ना ? आन मंग निदान हये येवढं पोर शिकलं, मोठ झालं, कायी नाव कमवलं तर कुठं बिघडतं" ? अशा उद्गारातून दामाच्या शिक्षणासाठी असणारी त्याच्या वडिलांची जिद्द आणि तळमळच दिसून येते. तसेच " पाणाडळी " या कादंबरीमध्ये सुध्दा भगा आपल्या भावांना सतत शिकण्यासाठी प्रोत्साहन देतो. त्यांच्या शिक्षणासाठी स्वतः कष्ट करतो, उपासमार सहन करतो. भावंडांनी शिकावे, त्यांनी योग्य मार्गाला लागावे म्हणून भगा

आयुष्यभर कष्ट आणि दुःख सहन करतो. या दोन्हीही कादंबरीतील नायकांची शिक्षणासाठीची धडपडच दिसून येते.

" रानझळगी " या कादंबरीमध्ये दुष्काळाच्या अस्मानी संकटामुळे दामाच्या कुटुंबाची वाताहात होते. गावामध्ये काम मिळत नसल्याने खाण्याचे खूप हाल होतात. एकवेळ कण्या आणि दुस-या वेळेला गाजर उकडून खाण्याची वेळ येते तेव्हा दामाचे कुटुंब शेजारच्या वाडीला कामाला जातात तेव्हा दामाला खूप दुःख होते त्यावेळेस त्याची आई म्हणाजे." अन् तू तर सम्दं बगतच आलास ना रं भाऊ ? काय राहयलं इथं आता ? निस्तं म्हणायला गाव आन् घर, शेत अन् वतनदारी आरं जिथं पोटाला दोन येळा मिळत न्हायी, तिथं राहून तरी काय उपेगय ".[2] अशा उद्गारातुन ग्रामीण लोकांच्या जीवनपध्दतीवर प्रकाश पडतो त्यांना भोगाव्या लागणा-या मानसिक त्रासाचे चित्रण येते. तसेच " पाणघळी " कादंबरीमध्ये बापाच्या मृत्यूनंतर भगाच्या मनस्थितीचे वर्णन निवेदनातून लेखकाने केले आहे. " बहयनीचं लगन करायचं जुनं देनं-घेनं काय आसंल तर असू पर दाव्हय-तेराव्याचं करजं तर आपल्या हातचंय...काय काय करावं ? भाऊ शिकवावं, बहयनीचं लगन करावं, का गहाण पडलेलं रान सोडवावं ? घर चालवावं का भायेरचं बगावं ? काय करावं ? एकाएकी त्याचं उर दडपत गेलं. वझं वाढत गेलं मन दुबळं बनत गेलं ".[3] अशा कठीण परिस्थितीत सापडलेला भगा गोंधळून जातो. ग्रामीण भागातील प्रत्येक शेतमजूराची अशीच अवस्था आहे. त्यांच्या जीवन जगण्याच्या प्रत्येक घडीला समस्या निर्माण होतात आणि त्यांचे निवारण करण्यासाठी त्यांच्या जीवनाची परवड होते.

" रानखळगी " या कादंबरीमध्ये दामाचे वडील आप्पा अहोरात्र कष्ट करुन आपल्या मुलाला शिकवत असतात. मोडून पडलेल्या संसाराला सावरण्याचा प्रयत्न करतात. फाटत गेलेल्या संसाराला कष्ट करुन, उपासमार सहन करुन ठिगळ लावण्याचा प्रयत्न करतात त्याचप्रमाणे " पाणघळी " या कादंबरीमध्ये बापाच्या वचनात अडकलेला भगा आयुष्यभर कष्ट करतो, उपासमार सहन करतो व आपल्या भावडांना मार्गी लावतो त्यामुळे त्याचा स्वतःचा संसार मोडून पडतो अशा चित्रणातून ग्रामीण जीवन पध्दतीमध्ये कुटुंबात असलेला प्रेमळपणा, स्नेह, जगण्याची जिद्द संघर्ष करण्याची प्रवृत्ती, दिलेला शब्द पाळण्याची वृत्ती याचेच आपल्याला दर्शन होते. " रानखळगी " कादंबरीमध्ये प्रत्येक कुटुंबामध्ये असतो त्याप्रमाणे आई, आप्पा, आई आजी असा भावनिक संघर्ष आहे. त्याचप्रमाणे " पाणघळी " या कादंबरीमध्ये सुध्दा भगाची बायको परभा जगू व दिना यांच्या वागण्याबद्दल चिडते पण या दोन्ही कादंब-यातील संघर्ष कायम टिकणारा नाही. कारण हा संघर्ष परिस्थितीने निर्माण केलेला आहे. ज्या दुःखद, कष्टदायक परिस्थितीत ते लोक राहतात त्यातून हा संघर्ष निर्माण होतो. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनाचे चित्रण या कादंब-यातून प्रभावीपणे आले आहे.

आपल्या भावडांनी शिकावे ही भगाची खूप तळमळ असते. आपल्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे आपण आपल्या भावडांना सर्व सुख सोयी देऊ शकत नाही याची जाण त्याला आहे तो म्हणतो " आपल्या पोरायच्या अंगावर सोयीची कापडं न्हायीत. पुस्तकंबी आरध्या किमतीतली जुनी.ती बी येळंवर न्हायी रोज कोसभर जावं-यावं लागतं. पायाला निदान हॅंगडयावाकडया वाहाणा तर खरं ? त्याचं तरी काय चुकतंय ? आपुनच कुठं तरी कमी पडतोय

त्यांची हाऊसमऊज केली पाहयजी .[४] अशा प्रसंगातून भगाच्या कुटुंबावरती प्रकाश पडतो. भावंडासाठी बोलवर विचार करणारा भगा खूपच परिणामकारक वाटतो. त्याचप्रमाणे " रानखळगी " या कादंबरीमध्ये सुध्दा दामाच्या मॅट्रीकच्या परीक्षेच्या फी साठी दामाचे वडील अप्पा घरातली एकमेव गाय विकतात यातून त्यांची शिक्षणासाठीची असलेली तळमळच दिसून येते. रानखळगी संदर्भात लिहताना विश्वनाथ शिंदे लिहितात " अशा कुटूंबातील मुलाला शिक्षण घेताना कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते. याचे चित्रण करताना अधिक वास्तव वाटावेत अशा प्रसंगाची योजना करुन जीवनाचे चित्रण केले आहे ते चित्रण परिणामकारक झाले आहे. वाचकाच्या मनाचा ठाव घेण्याचे सामर्थ्य त्यात येते. ते केवळ दामाचे जीवन नसते तर दामासारख्या अनेक कुटूंबाची ती कथा होते.[५] हे त्यांचे मत योग्यच आहे. ग्रामीण जीवनातील लोकांचे कशाप्रकारे भयंकर हाल होतात. त्यांना कोणकोणत्या प्रसंगाला तोंड दयावे लागते या संबंधीचे अनेक प्रसंग या दोन्ही कादंब-यात आलेले आहेत.

परंपरागत चालत आलेल्या रुढी, संकेताना ग्रामीण जीवनात खूपच स्थान आहे असे अनेक संदर्भ या कादंब-यात आहे. अशाप्रकारे या कादंब-यातून कुटुंबाचे चित्रण आले आहे.

दारिद्र्याचे चित्रण :
---------------

या दोन्ही कादंब-या ग्रामीण वातावरणातील गरीब शेतकरी शेतमजूराच्या जीवनाचे चित्रण करणा-या असल्याने शेतमजूराच्या जीवनाचे चित्रण करणा-या असल्याने शेतमजूराच्या वाटयाला येणा-या कष्टदायक, दु:खद, दारिद्र्याचे चित्रण या कादंब-यात आले आहे.

पोट भरण्यासाठी आयुष्यभर कष्ट करणे, संसार चालविण्यासाठी कधी उपाशी तर कधी अर्धपोटी राहणे, अशा अनेक संकटाना तोंड दयावे लागते. पोटासाठी मान-अपमान सर्व विसरावे लागते अशा अनेक प्रसंगाचे चित्रण या कादंबरीत आले आहे.

"रानखळगी " ही कादंबरी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवरची असल्याने या कादंबरीत तर दारिद्रयाचे जागोजागी वर्णन आढळते. दुष्काळाच्या पूर्वी दामाच्या वडिलांची चांगली परिस्थिती असते. बैलबारदाणा असतो. मोसंबीची बाग असते. विहिरीला भरपूर पाणी असते पण दुष्काळ पडतो आणि दामाच्या कुटुंबाची वाताहात सुरु होते. घरात असलेले धान्य संपते. जवळ पैसे तर नसतात मग एकवेळ भरडलेल्या कण्या आणि एकवेळ उकडलेली गाजरे खाण्याची वेळ दामाच्या कुटुंबावर येते. पाउस उशीरा पडतो पण बी विकत घ्यायला सुध्दा पैसे नसतात तेव्हा आजीच्या गळयातले मणी विकून मुगाची पेरणी करतात. दामाची आजी म्हणते, " भऊ, आता जीत्यापणी हये आसले हाल बगवना झालं आनृ मेल्यावर तरी त्ये काय कामी सायचेत ? निदान देवा कुरपेनं आलं कायी चांगलं पीक तर खातील लेकरं-बाळ ."[6] या उद्गारातून आजीच्या मनाचा मोठेपणा तर दिसतोच पण बी घेण्यासाठी गळयातील सोनं मोड-ण्याची वेळ शेतक-यावर येते ही भयानक वास्तवता मन बधीर करून जाते. दामाचे आई वडील बलिंगच्या कामासाठी जातात. उपाशी राहून कष्ट करतात पण दामाला मात्र शिकण्यासाठी प्रेरणा देतात. या कादंबरीमधून शेतक-याच्या भीषण दारिद्रयाचे चित्रण आले आहे. त्यामुळे त्या परिस्थितीत ते कसे जीवन जगतात याचेपण चित्रण खूपच परिणामकारकपणे आलेले आहे. " आजी म्हणत व्हती तेच खर व्हतं, शेतीतला माणूस मातीत जल्मतो, मातीत राबतो आन मातीमेळ व्हतो, पर कवाच वर येत नाही."[7] आजीच्या या उद्गारातून

दारिद्र्याबद्दलचे परखड अनुभवच दिसून येतात. शेवटी गावात काहीच काम मिळत नसल्याने दामाचे कुटुंब शेजारच्या वाण्याच्या मळयात कामाला जातात दारिद्र्यामुळे, पोटामुळे वतनाचा गाव सोडण्याची वेळ त्यांच्यावर येते. याच्यासारखी दुःखद घटना ग्रामीण लोकंच्या जीवनात दुसरी कोणती नसते. या कादंबरीतील दारिद्र्य उघडपणे आणि वास्तवपणे प्रकट झाले आहे. विश्वनाथ शिंदे म्हणतात " रानखळगी हे भीमराव वाघचौरे यांचे आत्मचरित्र असावे असे वाचकांना वाटते असे वाटणे हेच कादंबरीची वास्तवता स्पष्ट करते ".[८] हे त्यांचे मत योग्यच आहे कारण दुःखाचे, दारिद्र्याचे अनेक प्रसंग लेखकाने उभे केले आहे ते वाचून मन भरुन येते. ग्रामीण शेतक-याच्या कष्टप्रद जीवनाचे आणि त्यांना भोगाव्या लागणा-या मानसिक व शारीरिक त्रासाचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत आले आहे. दामाला खात्री नसताना दामा मॅट्रीक पास होतो पण जयवंता मात्र नापास होतो. दामा त्याला सांगतो की घरच्या वाईट परिस्थितीमुळे मीहीपुढे शिक्षण घेऊ शकत नाही तेव्हा तुझी व माझी परिस्थिती एकच आहे. तेव्हा जयवंता म्हणतो की गरीबासाठी काही सवलती असतील तर चौकशी कर तेव्हाचे दामाचे उद्‌गार खूपच परखड आहेत. " सम्द केलं फक्त मागास जातीयलाच सरकारी पयसा मिळतो. मंग त्यांचे बापं हापीसर आसले तरी त्यांना सरकारी पयसा आन् एखांद्याचा बाप मातो वठीत उपाशी मरत असला तरी त्यांला काय न्हायी कामून तर त्याची जात मोठी कुळ मोठं काय चाटायचंय त्या जातीला ? मी तर म्हणतो जयवंता माणसाला कोंचीच जात नसते त्याला आसतं फक्त पोट ".[९] दारिद्र्याच्या निराशेतून आलेले उद्‌गार खूप काही सांगून जातात आर्थिक विषमतेमुळे भूमीपूत्राचे किती भयानक दिवस आले आहेत हे लक्षात येते.

जीवापाड जपलेली मोसंबीची बाग तोडून त्याचे सरपण दामाचे वडील विकतात. दामाच्या फीसाठी एकमेव असलेली गाय विकतात. बैल विकतात आणि आपला संसार सावरण्याचा प्रयत्न करतात. उपासमारीने दामाचे कुटुंब हैराण झालेले असते. घरात खायला भाकरीसुध्दा नसते. दामाचा लहान भाऊ भाकरीसाठी रडत असतो तेव्हा जयवंता भाकरी देतो तेव्हा दामा जयवंताला विचारतो.
" जयवंता, का, रं, ? तू जवा घरातून भाकरी आणातो तवा तुला कोणी तरी इचारीत आसंल ना र ?

म्हंजी ?

आता समज तू चुलीकडं गेला. त्वा टोपल्यातून भाकर घेतली तवा तुजी आय म्हणा, चुलती म्हणा. कोणतरी इचारत आसंल ना की तुज तर जेवन झालं, आन् भाकरी कुंठ चालवली म्हून....? हात तेच्यायला ! त्येचं काय येवढं! परसंग बगून नेतो येळ मारुन त्येच्यात काय येवंढ ?

तरी पर....तुला काय तरी कारण सांगावं लागत आसलं ना ?
आता जयवंता काय सांगतोय म्हून मी उतावळा झालो व्हतो. " आता तूच सांग घरच्या लोकांना हामीशा तुजं नाव सांगणं म्हंजी मला बी बोलणो आन् तुजीबी मानहानी व्हायची का ?
" आरं मंग तू सांगतो तरी काय आसं ?
" इचारलं तर सांगतो- चालतो खळ्यात कुत्र्याला भाकर... "[10]
अशा प्रसंगातून शेतक-याच्या जीवनाचे वास्तवादी चित्रण येते. मान-अपमान बाजूला सोडून कशा भयानक प्रसंगाला हे लोक तोंड देतात हे वाचून हृदयाला पीळ पडतो. अशा दुःखाच्या प्रसंगी लेखकाची वास्तववादी समजही दिसून येते. आजपर्यंतच्या मराठी साहित्यात दलितांच्या जीवनाचे दुःख दलित आत्मकथनातून आलेले आहे पण ग्रामीण समाजामध्ये असा एक दलितेतर वर्ग आहे की ज्यांचे जीवन दलितांसारखे भयानक आहे अशा या लोकांचे चित्रण अभावानेच

मराठी साहित्यात आलेले आहे परंतु या दोन्ही कादंबरीतून दलितेतर लोकांच्या भयावह जीवनाचे चित्रण प्रभावीपणे मांडले आहे. दामाच्या आयुष्यात घडलेला वरील प्रसंग याची साक्ष देतो

लायब्ररी कोर्ससाठी दामा औरंगाबादला येतो. तेव्हा गावातील लोक पैसे जमा करुन त्याला देतात. गिरासेभाऊच्या ओळखीने जनार्दन स्वामीच्या आश्रमात दामाची राहण्याची सोय होते तेव्हा तेथे दामाचे उपासमारीने खूप हाल होतात. मानसिक त्रासामुळे हे सगळं सोडून जाण्याचा विचार दामा करतो. नोकरी मिळविण्यासाठी अनेक हॉटेलमध्ये तो चकरा मारतो पण कोणीच त्याला नोकरी देत नाही आईने करुन दिलेल्या भाकरीवर दोन चार दिवस कसे तरी काढतो त्यावेळचा प्रसंग तर मन हेलावून सोडणारा आहे. " पोटी उघडून भाकरी सोडल्या आनृ एक कसा तरी उबट- इटक वास नाकात शिरला भाकरीचा तुकडा मोडला तर त्याच्यातून तार तुटायला लागली व्हती. भाकरी पार इटून गेल्या व्हत्या बेसन व्हवून पडलेलं पोटात खळबळ उठलेली भाकरी तर फेकून बी द्यावं वाटंना... नाक दाबून पाण्याच्या घोटासंग भाकरी संपवल्या"[11] अशा प्रसंगातून शेतक-याच्या आणि शिक्षणासाठी धडपडणा-या त्यांच्या मुलांच्या खडतर परिस्थितीचे चित्रण येते. हे चित्रण खूपच वास्तववादी आहे. दारिद्र्यामुळे त्यांच्या जीवनात कसे प्रसंग येतात हे पण दिसून येते. दामा पी. यु. सी. ला नापास झाल्यावर जयवंताच्या शेतात सालानं राहतो. नंतर एम्. एस. ई. बी. मध्ये लेबरची कष्टदायक कामे करतो. बोर्डींगमध्ये पाणी भरण्याचे काम करतो. झाडासाठी खड्डे खोदायचे काम करतो. लायब्ररी कोर्ससाठी औरंगाबादला हॉटेल अशोका मध्ये फरशी पुसण्यापासून ते कप-बशी धुण्यापर्यंत सर्व कामे करतो. कॉलेजच्या ग्रंथालयात काम करतो. ही सर्व कामे तो शिक्षण घेण्यासाठी करतो. घरी असलेल्या

भयानक दारिद्र्यामुळेच त्याला ही कामे करावी लागतात. दामा म्हणतो " आप्पाच कामून असं होतं ? कोंच्या नवकरदारापेक्षा कमी काम करीत होते ? कोंच्या कामगारापेक्षा कमी राबत होते ? ढोरागत राहणं, ढोरागतं खाणं आन् ढोरागत राबणं, पर एवढं करुनबी चांगलं पांघरुण कवाच त्यांच्या अंगावर दिसलं नाही. निवांतपणं चार चांगलं घास कवा त्यांच्या भांड्यात दिसलं न्हायी कामून व्हत असंल असं ?."[12] हे दामाचे विचार वाचकाला अंतर्मुख करायला लावणारे आहेत. ग्रामीण शेतक-याच्या भीषण दारिद्र्याचेच दर्शन यामधून होते.

" पाणधळी " या कादंबरीची पार्श्वभूमी जरी दुष्काळी नसली तरी या कादंबरीमध्ये एका शेतमजुराच्या वाट्याला कसे भयाण परिस्थितीचे जीवन येते याचे प्रत्ययकारी चित्रण आले आहे. भगा या कादंबरीचा नायक आहे त्याची बायको परभा ती पण आपल्या नव-याला सर्व प्रकारे मदत करत असते. भगाचा बाप तिरमक हा एक शेतमजूर असतो. विहिरीचं काम करताना अपघात होवून तो मरतो. त्या प्रसंगाचे चित्रण लेखकाने केले आहे " त्या दिशी इहिरीत सम्दी जणं टोळीतली, उतरलेली, आबा बी आतच सातव्या परसाचं काम चालू इहिरीतली दगडं काढायला माल्डी लावलेली. दगडाची खेप गंजीवर टाकली आन् नाड्याच्या मुदनीतून कशी माल्डी निसटली, देव जाणे ! जाऊन आदळली ती आबाच्या डोक्यावर आबा तिथंच आडवं झालेलं कसं तरी वर काढलं पाणीफिणी पाजलं ."[13] या प्रसंगात शेतमजुराच्या वाट्याला येणारे कष्टप्रद जीवनच दिसून येते. त्याचे जीवन किती असुरक्षित आहे हे लक्षात येते. दारिद्र्यामुळे त्यांच्या जीवनात सुख कधीच येत नाही हे लक्षात येते. मरताना भगाचा बाप भगाकडून " भगा, माजं आता... आटपाल्यालंय सम्दं संबाळ, पोरीचं लगन...पोरं शिकवं, कायबी करुन... नवकरीला लाव."[14]

असं संसाराचे ओझं भगाच्या खांदयावर टाकून भगाचा बाप मान टाकतो आणि इथूनच भगाच्या आयुष्याची परवड चालू होते. बापाच्या दहाव्या-तेराव्याचा खर्च करण्यासाठी सुध्दा भगाला कर्ज काढावे लागते. ग्रामीण जीवनातील गरीब शेतमजूराला जन्मापासून ते मरेपर्यंत प्रत्येक गोष्टीला कर्ज काढावी लागतात. कारण दारिद्रय त्यांच्या पाचवीला पुजलेले असते. भगाचा चार बिघ्याचा तुकडा त्याला स्वतःला कसणे शक्य नसते. कारण दारिद्रयामुळे त्याच्याकडे बैल-बारदाणा नसतो म्हणून तो गावातीलच गजा धोराताला ती तो बटईनं कसायला देतो. ते सुध्दा बी भरणाचा खर्च भगाने करायचा आणि शेती कसायची गजा धोराताने उत्पन्न बटईच्या रीतीप्रमाणे निम्मे-निम्मे वाटून घ्यायचे खरे तर हा हिशोब भगाला परवडणारा नसतो पण गरिबीपुढे इलाज नसल्याने " पडित ठिवायपेक्शा तेवढंच आलं घरापुरतं तर दाण्याचं भागलं ".[15] या विचाराने भगा हा सौदा मान्य करतो ग्रामीण भागात गरीब हा खूपच गरीब होत जातो आणि सधन लोक त्याचे शोषण करत जातात. ग्रामीण भागातील शेतमजूर एकदा का कर्जाच्या विळख्यात सापडला की तो जन्मभर त्याच्यातून सुटत नाही. भगा परभाला म्हणतो " आग मंग देनं हाय ते पोटुशी बाईच्या पोटागत ते वाढतंच राहतं ".[16] या उद्गारातून तो ग्रामीण शेतक-याच्या अवस्थेतच चित्रण करतो. परभा गरोदर असल्याचे त्याला सांगते तेव्हा बाप होणार या आनंदापेक्षा येणा-या नव्या ओझ्यान तो दुःखी होतो. अशा प्रसंगातून शेतमजूराच्या मनाला कशा-कशा प्रकारच्या यातना होत असतील याचे दर्शन होते.

भगा स्वतःच्या बहिणीचे लग्न करण्यासाठी घरी असलेल्या सर्व शेळ्या विकून टाकतो व त्याच्यावर शांतीचे लग्न करतो बापाच्या दहाव्या-तेराव्यासाठी काढलेल्या कर्जासाठी पंडा पाटील शेरड घेऊन जातो; असे अनेक प्रसंग ग्रामीण शेतमजूराच्या दारिद्र्याचे वास्तव रेखाटन करतात. काहीतरी विकलं अथवा गहाण ठेवलं तरच मंगल कार्य करता येतात हे दिसते. भगाचा लहान भाऊ दिना व जगू शाळेत जात असतात. तेव्हा शाळेला जाण्यासाठी दिना भगाकडे सायकलची मागणी करतो तेव्हा जगू म्हणतो " सायकलीवर बसायलाबी नशीब लागतं म्हन्लं आपल नशिबात जर तंगडया तोडीत शाळा करणं आसलं तर त्याला भगान्नाबी काय करील " [१७] या प्रसंगातून शेतमजूराची मुले कशी शाळा शिकत असतील त्यांना वेळेवर कपडे नाहीत, पायात चपला नाहीत. पुस्तके वहया मिळत नाहीत. दररोज चार कोस चालतजावून शाळा शिकायची अशा दारिद्र्याचेच वर्णन या कादंबरीत आले आहे.

जगूला नोकरी लावण्यासाठी भगा स्वतःची जमीन पंडा पाटलाकडे गहाण ठेवतो. नंतर जगूचे लग्न करतो. पण ऐष - आरामात राहण्याची सवय असलेला जगू लग्न झाल्यावरही काहीच काम करत नाही. नेहमी बायकोसमोरच बसून राहतो. तेव्हा भगा त्याला म्हणतो, " काय तरी कर काय तरी बग पोटापाण्याचं आपून काय कोणी तालेवार न्हवत आयतं बसून खायला आमी दोघायनं तरी कवर वढावं रं ! आरं, आठवतं तस वढतोय आबा गेल्यापासून " [१८] यावरुन त्यांची खूप भांडणे हातात आणि जगू घर सोडून या प्रसंगापासून भगा खूपच कोलमडून पडतो.

दिनाच्या लग्नाच्या वेळी शांती व तिचा नवरा मांडव परतीणीच्या आहेरासाठी अडून बसतात. त्यांना आहेर करण्या-साठी भगाजवळ एवढे पैसे नसतात तसे तो त्यांना सांगतो पण

शांती भगाला खूप वाईट बोलते आणि तणतणतच ती माहेरचे संबंध तोडून टाकते. ग्रामीण जीवनात श्रध्देचे स्थान असलेल्या कुंकवाचा अव्हेर करुन निघून जाते. या प्रसंगात लेखकाने ग्रामीण रीतीरिवाज व पारंपरिक श्रध्दांचा शकून अपशकूनांचा वापर करुन एकूणच परिणामकारकता प्रभावीपणे वाढविली आहे. या भगाच्या मनस्थितीचे आणि दारिद्र्याचे वर्णन निसर्गप्रतिमांचा वापर करुन लेखकाने फारच छान मांडले आहे. " कवळी दुपार चढत व्हती. उन्हंबी लागली व्हती. आता उन आसंच तळपत राहणार व्हतं...वर आभाळ आनु खाली पिरथमी आसीच तापत-तावत राहणार व्हती...सम्दं सम्दं आता सोसावं लागणार व्हतं । रेटावं लागणार व्हतं...."[१९] शेवटी भगा मरणाच्या दाराच्या टेकतो. परभा नव-याच्या पोटात चांगले घास जावेत म्हणून भगाचा मित्र मन्सूबच्या घरी ज्वारी उसनी मागायला जाते तेव्हा त्याची बायको तिच्या हाती चार पाच चपात्या देते तेव्हा आपली लायकी कुत्र्यासारखी किंवा दारच्या भिका-यासारखीच आहे असे तिला वाटते. व ती स्वाभीमानाने चपात्या न घेताच येते हा प्रसंग सुध्दा शेतक-याच्या भीषण दारिद्र्याचेच चित्रण करतो व तशा अवस्थेतच भगा बायकोला व पोरीला निराधार अवस्थेत सोडून मरण पावतो.

अशाप्रकारे या दोन्ही कादंब-यामध्ये ग्रामीण शेतमजूर शेतक-याच्या दारिद्र्याचेच चित्रण आलेले आहे आणि हे चित्रण लेखक भीमराव वाघचौरे यांनी खूपच परिणामकारकपणे केले आहे. दोन्ही कादंब-यातील प्रसंग खूपच वास्तव वाटावेत असे रेखाटले आहेत. ग्रामीण शेतमजूरांच्या समस्या, त्यांचे प्रश्न, जगत राहण्याची त्यांची जिगिषा आणि येणारे दु:खद, कष्टदायक प्रसंग यामुळे त्यांचे दारिद्र्य खूपच परिणामकारकतेने आपल्या समोर येते.

संकटकाळी झालेली अनेकांची मदत :

" रानखळगी " व " पाणधळी " या दोन्ही कादंब-यात दोन प्रवाह एकमेकात मिसळलेले दिसतात. एकीकडे परिस्थितीच्या कचाटयात सापडून रानातल्या पाणघळयात कायमचा फसलेला दामाचा बाप आणि भगाचा संसार आहे तर दुसरीकडे या पाणघळयातून बाहेर पडण्याची धडपड करणारा दामा आणि भगा आहे. दामाला आणि भगाला या संकटाच्या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी अनेक लोक मदत करतात. दामाला प्राचार्य गिरासेभाऊ यांच्यासारखे देवदूतसमान लोक भेटतात तर जयवंतासारखा मित्र भेटतो तर भगाला शाळेपासूनचा मित्र मन्सुब आर्थिक व मानसिक आधार देतो.

" रानखळगी " कादंबरीमध्ये दामाला त्याचा मित्र जयवंता खूप मदत करतो. जयवंताच्या घरची परिस्थिती चांगली असते. अनेक अडचणीच्या वेळी जयवंता दामाला मदत करतो. दामाचे खाण्याचे हाल असतात. त्यावेळी शाळेत आपला डबा नेहमी त्याला खाण्यास देतो. घरच्या बिकट परिस्थितीमुळे दामाचे भरून आलेले मन अनेकदा तो जयवंताजवळच उघडे करतो. आप्पा व आई कामासाठी वाडीला गेल्यावर घरची सगळी जबाबदारी दामावर येते तेव्हा घर चालविण्यासाठी दामा जयवंताच्या शेतात उसाच्या खोडक्या काढण्याचे काम मिळवितो. मॅट्रीक परीक्षा देऊन आल्यावर सुट्टीमध्येय काहीच काम नसते. काम केल्याशिवाय पोट कसे भरणार ? शेवटी दामा जेवणाचे हाल होतात तेव्हा दामा मग जयवंताबरोबरच त्याच्या ट्रॅक्टरवर जायचा आणि तिकडेच जयवंताबरोबर जेवायचा. जयवंतालाही दामाच्या ह्या परिस्थितीची जाणीव असल्याने अनेकदा तो दामाला भाकरी सुध्दा आणून देतो. शेवटी पी. यु. सी. ला

नापास झाल्यावर तो जयवंताकडेच शेतात सालानं राहतो.

दामाला कॉलेजच्या दिवसात प्राचार्यांच्या रूपाने देवदूतच भेटतो. प्राचार्य त्याला मदत करतात असे नाही तर दिलेल्या सवलतीप्रमाणे त्याच्याकडून कामही करून घेतात. पी. यु. सी. परीक्षेचा फॉर्म भरण्यासाठी दामाकडे पैसे नसतात तेव्हा त्याला फीमध्ये सवलत देऊन त्याला मदत करतात. बोर्डिंगची फी भरायला पैसे नसतात तेव्हा बोर्डिंगचे पाणी भरण्याचे काम देऊन त्याचा तो पण प्रश्न मिटवून टाकतात. बी. ए. च्या परीक्षेवेळी बोर्डींग व फी चे ८० रुपये दामाला भरायचे असतात त्यावेळी त्याला बागेतील झाडांना पाणी घालण्याचे काम देतात. अशा अनेक प्रसंगी ते त्याला मदत करतात. पण ही मदत खैरात वाटल्यासारखी प्राचार्य त्याला देत नाही तर काही तरी काम दामाला करावयास देतात. स्वावलंबनाचे शिक्षण घेण्यास प्रवृत्त करतात.

दामा अशोका हॉटेलमध्ये काम करत असताना पुढे शिकायचे नाही असे ठरवितो. तेव्हा त्याला ते म्हणतात " इथं राहून कसं जमलं रे . इथं आयुष्यभर काम करून अखेर काय होशील तू ? जास्तीत जास्त एक वेटर, अन एका हॉटेल वेटरचं जीवन म्हणजे काय जीवन असतं हे तू अनुभवलंच त्यापेक्षा शिक्षण घे. निदान ग्रॅज्युएट हो. तुझ्या घरच्यांना तुझ्याबद्दल काही आशा-अपेक्षा असतील ना रे । एखादी नोकरी मिळव, आई-बापाला काही सुख दे. नाही तर असाच वाहवत जाशील ."[२०] असे आधाराचे शब्द बोलून त्याला मानसिक आधार देतात. कॉलेजच्या ग्रंथालयात महिना चाळीस रुपयावर काम देतात. शिक्षण घेण्यास प्रवृत्त करतात आणि शेवटी त्याला नोकरीपण देतात. अशा प्रकारे जिव्हाळ्याचे मार्गदर्शन करणारा शिक्षक, गोरगरीब मुलांबद्दल सहानुभूती दाखविणारा प्राचार्य व कठोर प्रशासक या तीनही व्यक्तिमत्वातून प्राचार्य दामाला मदत करतात.

संकटाच्या वेळी दामाला मदत करणारी आणखी एक व्यक्ती म्हणजे गिरासेभाऊ ते दामाला एम्. एस. ई. बी. मध्ये लेबर म्हणून काम मिळवून देतात. त्यावेळेस खुलताबाद, कन्नडला ते त्याला हरप्रकारे मदत करतात. लायब्ररी कोर्ससाठी औरंगाबादला जाण्यासाठी गावातल्या लोकांकडून देणगी गोळा करुन पैसे देतात. जनार्दन स्वामींच्या आश्रमात राहण्याची सोय करुन देतात. तसेच हॉटेल अशोकामध्ये नोकरी सुध्दा मिळवून देतात आणि परत वरती त्याला मार्गदर्शन करताना म्हणतात, " कसं ही कर पण अभ्यास करुन तेवढा पेपर काढ आन् पुना अॅडमिशन घे तुझ्यासारख्यांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही." [21] ग्रामीण मुलांची शिक्षणासाठी कशी परवड होते याची त्यांना जाण आहे या भावनेतूनच ते त्याला मदत करतात. नि:स्वार्थपणे आपुलकीने इतरांसाठी काम करणारी माणसे खेडया-पाडयात आढतात त्याचेच प्रातिनिधिक चित्रण गिरासेभाऊच्या रुपाने येते. अशाप्रकारे संकटकाळी, अडचणीच्या वेळी दामाला अनेकां ची मदत होते.

" पाणघळी " या कादंबरीमध्ये सुध्दा भगाला त्याच्या संसारात सावरण्यासाठी त्याचा मित्र मन्सुब शाळेपासूनचे सोबती पण परिस्थितीमुळे भगा शेतमजूरच राहीला आणि मन्सुब मात्र गावातला-गावगाडयातला कर्ता माणूस झाला. तरीसुध्दा भगाला मन्सुबचा फार मोठा आधार मिळाला. मृत्युशय्येवरील बापाला दिलेला शब्द पाळण्यासाठी घराची सर्व जबाबदारी भगावरती येते. तो खुप कष्ट करतो. त्याची बायको परभा पण त्याला मदत करते. आलेल्या जबाबदारीने कर्तव्याच्या आठवणीने भगा खूप गोंधळून जातो. गोंधळलेल्या स्थितीत माणूस कुणाचा तरी आधार शोधत

असतो. तेव्हा मन्सुब त्याला आधार देतो. मन्सुब म्हणतो " कायी न्हायी म्होरं तू फक्त हिंमत धर बापाची जागा घेऊन बाप व्हऊन तुला आता सम्दं करायचंय जे बापाला आजवर जमलं न्हायी, ते तुला करुन दावायचंय ".[२२] अशा बोलाने भगाला पुढे जगण्याचं बळ निश्चितच येते. भगाची बहीण शांतीसाठी मन्सुब किनगावचे स्थळ सुचवतो. पण भगामात्र लग्नाला येणा-या खर्चामुळे गोंधळतो एवढा पैसा कोठून आणायचा म्हणून घाबरतो. त्यावेळेस मन्सुब त्याला म्हणतो " आसं कसं चाललं भगा ? कवा तरी एकदाचा तो खरचं व्हायेच ना ? शिवाय ठिकाण हाताभायेरचं न्हायी आपल्या आसं घर मिळायचं न्हायी पुना. हिंडत बसशील आनं चिंगळ्या चापलीत बसशील तर कायीच हातात यायचं न्हायी ".[२३] या प्रसंगातून मन्सुब आपल्या व्यवहारज्ञानाने भगाची मनधरणी करतो आणि त्याला आधार देतो व सगळं बघून घेतो म्हणून शब्द देतो. तेव्हा भगा म्हणतो " म्या आता उभा राह्यलोच तर समदं तुज्याबळावर समज तुजीच बहीण समजून लाव बाबा हात येऊ दे पाटव्हणी ".[२४] आणि मन्सुबच्या आधाराने भगा शांतीचे लग्न करतो व एका जबाबदारीतून मोकळा होतो.

परभा बाळंत होते तेव्हासुध्दा मन्सुबची आई स्वत:च्या लेकीसारख तिचं सगळं करते. तिला मरणाच्या दारातून ओढून आणते ह्या प्रसंगातसुध्दा मन्सुबच्या कुटुंबाची भगाला मदत होते. मन्सुबला त्रास देण्याच्या हेतूनेच पंडा पाटील शांतीच्या सासरकडच्या लोकांना काहीतर वेगळं सांगतो. तेव्हा शांतीला सासरकडचे लोक त्रास देतात. शांती परत भगाकडे येते तेव्हा मन्सुबच परत तिला पाठवून देतो. तेव्हा मन्सुब भगाला म्हणतो " रेसमाच्या गाठी असल्यात ह्या तोडणं सोपंय, पण जोडणं जड जात आस्तं. आपलेच केसं त्यांच्या दारात पसरलेत त्यांचा गुंता वाढायच्या आगुदर जरा इचारानं सावरुन

घे .[२५] या उद्‌गारातून मन्सुब भगाला व्यवहारात सुध्दा कसे वागायचे याचे ज्ञान देतो. जगूच्या नोकरीसाठी सुध्दा भगा मन्सुबच्या मदतीनेच शब्द टाकायला सांगतो व आपली शेती पंडा पाटील याच्याकडे गहाण ठेवतो व आलेले पैसे विश्वासाने मन्सुबकडेच ठेवायला देतो. अशाप्रकारे भगाच्या फाटक्या संसारात मन्सुबची साथ मिळते. मन्सुब मित्रापोटी त्याला सर्व प्रकारची मदत करतो. मानसिक व आर्थिक बाबतीत मदत करतो.

या दोन्हीही कादंबरीत नायकाला संकटकाळी मिळणारी मदत वेगवेगळया प्रकारची आहे. " रानखळगी " मध्ये शिक्षणासाठी धडपडणा-या दामाला प्राचार्य , गिरासेभाऊ, जयवंता यांच्याकडून ओझ्यानं गोंधळलेल्या भगाला मन्सुब प्रथम मानसिक आधार देतो आणि जबाबदारीतून मोकळा होण्यासाठी पुन्हा आर्थिक मदत ही करतो. दामाच्या आयुष्याला मदतीमुळे एक वेगळेच वळण मिळते व त्याला नोकरी लागते पण भगा मात्र मन्सुबच्या मदतीने जबाबदारीतून मुक्त होतो मात्र स्वत:च्या सगळया संसाराची परवड करुन घेतो व त्यातच त्याचा शेवट होतो.

चांगुलपणाचा फायदा घेणारी माणसे :
-----------------------------------

" रानखळगी " व " पाणधळी " या कादंब-यामध्येच दामाला व भगाला संकटकाळी मदत करणारे अनेक लोक भेटतात हे आपण पाहिलेच पण दामाच्या व भगाच्या कुटुंबाच्या चांगुलपणाचा फायदा घेणारीसुध्दा अनेक माणसे या कादंबरीत चित्रित झालेली आहेत. ग्रामीण भागातील लोक आपल्या भोळया-भाबडया समजुतीवर जगत असतात. दारिद्र्यामुळे त्यांच्या जीवनात दुबळेपणा आलेला असतो. अशा परिस्थितीत त्यांच्या चांगुलपणाचा फायदा घेणारी माणसे आढळतात ही माणसे शक्यतो घरातील व नातेसंबंधातीलच असतात.

तर कधी कुटुंबाच्या बाहेरीलसुध्दा असतात. अशा लोकांचे चित्रण करुन ग्रामीण लोकांच्या जीवनपध्दतीवर भीमराव वाघचौरे यांनी प्रभावीपणे प्रकाश टाकला आहे.

" रानखळगी " या कादंबरीमध्ये दुष्काळाच्या संकटामुळे दामाचे कुटुंब मेटाकुटीला आलेले असते. जीवघेणी उपासमार, कष्ट, दारिद्र्य यामुळे हे कुटुंब वैतागलेले असते. दुष्काळापूर्वी सुखात असणारे कुटुंब आता दुष्काळाने बेजार झालेले असते. अशा प्रसंगी त्यांच्या पुढे एकच चांगले स्वप्न असते ते म्हणजे मोसंबीच्या बागेचे येणारे पैसे. या येणा-या पैशावर आप्पांनी पुढची स्वप्ने रंगवलेली असतात. त्याप्रमाणे बागवान येऊन जातात पण पैशाच्या देण्या-घेण्यातून बागवानाचा व आप्पांचा सौदा फिसकटतो. शेवटी दामाच्या वाकडीच्या आत्याचा नवरा काही बागवानाला घेऊन येतो आणि मोसंबीची बाग विकत घेतो व वाकडीच्या पाहुण्याचा स्वभाव कसा आहे हे दामाच्या आईला माहित असते. त्यामुळे तिला संशय येत असतो. बागेचे जास्त पैसे आले नाहीत असे दामा म्हणतो तेव्हा त्याची आई म्हणते " पयशाचंकायी व्हवू भऊ, पर मला त्या पावण्याचाच काय तरी डाव दिसतोय. तुबा बाप न्हायीच म्हणत व्हता, पर त्येनं म्हातारीला घेतलं बाजूला कवरभर काय तरी खसपस झाली अन् घेतला आखीर म्हातारीनं इसार" २७ शेवटी आईचा संशय खरा ठरला ज्यादिवशी बागेचे पैसे येतात त्याचदिवशी परत पाहुणा घरी येतो. खूप वेळ आजी व आप्पाशी बोलतो. तो पैसे मागायला आलेला असतो. पण आजीला व आप्पांना असा कष्टाचा पैसा रात्री कुणाला दयायची इच्छा नसते पण वाकडीच्या पाहुण्याला माहित असते. आजीला गोड गोड बोलून राजी केले की आजीपुढे आप्पा काहीच बोलत नाहीत तेव्हा आजीला म्हणतो, " कायीच इचार करु नका मासूबाय, लक्ष्मी

वाढतीय, चांगल्या-चांगल्यांना आस साधत न्हायी... दोन सालापुरती तर भानगड हाय दाम दुप्पट व्हत्यात..." [२७]

अशा बोलण्याने आजीला भुरळ पडते व अर्ध्या रात्री आजी पैसे पाहुण्याला देते. तेव्हा दामाला व त्याच्या आईला खूप वाईट वाटते. आई तर बरेच दिवस घरात थयथयाट करते. कष्टाचा पैसा असा हातोहात गेला याचे तिला दुःख होते. वाकडीचा पाहुणा एकदा पैसा घेऊन जातो तो परत येतच नाही. अनेक संकटाच्या वेळी दामा त्यांच्याकडे पैसे मागायला जातो पण पाहुणा हात वर करतो व शेवटी दामाच्या कुटुंबाची फसवणूकच करतो. अशा प्रकारचे प्रसंग ग्रामीण जीवनात नेहमी घडत असतात. त्याचे प्रभावी असे चित्रण भीमराव वाघचौरे यांनी केले आहे.

" पाणघळी " या कादंबरीमध्ये सुद्धा भगाच्या चांगुलपणाचा फायदा अनेक लोक घेतात. बापाच्या मृत्युनंतर भगावर घराची जबाबदारी येते. बापाच्या दहाव्या-तेराव्याच्या खर्चासाठी भगा, पंडा पाटील यांच्याकडून कर्ज काढतो त्याच्या बदल्यात तो आपली शेरडं लिहून देतो शेवटी भगा कर्ज देऊ शकत नाही म्हणून पंडा पाटील शेरडं ओढून नेतो. भगाचा चार बिघ्याचा जमिनीचा तुकडा असतो. त्याला तो घरी कसणे शक्य नसते त्यामुळे तो गजा थोराताला बटईनं कसायला देतो. भगाला हा बटईचा सौदा परवडणारा नसतो पण तरीही नाईलाजाने तो हा सौदा मान्य करतो या दोन्ही प्रसंगातून भगाच्या चांगुलपणाचा फायदा घेणारी माणसेच दिसून येतात. भगाकडे हा चांगुलपणा त्याच्या दारिद्र्यानेच आलेला असतो. दुःख, दारिद्र्य यामुळे आपली फसवणूक होते आहे हे त्याच्या लक्षात येते पण तो काहीही करू शकत नाही.

हे बाहेरचे लोक तर भगाच्या चांगुलपणाचा फायदा घेतात पण भगाचे दोन भाऊ व बहीणसुध्दा त्याच्या चांगुलपणाचा फायदा घेतात. भगा आयुष्यभर कष्ट करुन आपल्या भावडांना मार्गी लावतो पण हे सर्वजण भगाला एकटे सोडून निघून जातात. जगूच्या शिक्षणासाठी भगा अहोरात्र कष्ट करतो. त्याला शिकवतो त्याच्या नोकरीसाठी आपली जमीन दोन हजार रुपयांसाठी गहाण ठेवतो. जगू लग्न झाल्यावर सुधारेल म्हणून भगा त्याचे लग्न करतो. पण जगू ऐषआरामातच राहतो. शेवटी जगूला व त्याच्या बायकोला पोसणे भगाला असह्य होते तो त्याला काहीतरी काम कर म्हणून सांगतो. मी व परभाने तरी किती काम करायचे, आबा गेल्यापासून हा संसाराचा गाडा रेटतो आहे असे सांगतो तेव्हा जगू म्हणतो " बस झालं आता! बस करा आता तुमचं ते पुराण, आजवर कळतं तसं तेच आयकत आलेय मी. आयकून आयकून पार कानं किटलेत माजे तर आबा गेल्यापासून हे केलं आन् आबा गेल्यापासून ते केलं....आता मला एकच सांगा, मी इथं राहू का नको ? "[२८] असे ऐकून भगाचा तोल सुटतो तो जगूच्या अंगावर जातो. दुस-या दिवशी जगू बायकोसह घर सोडून जातो.

शांतीच्या लग्नासाठी भगा आपली सगळी शेरडं विकतो आणि तिचे लग्न करतो ही शांती सुध्दा दिनाच्या लग्नाच्या वेळी मांडव परतणीच्या आहेरासाठी रुसते आणि मला माझं माहेर मेलं म्हणून निघून जाते. सुरुवातीला चांगलं वागणारा दिनासुध्दा लग्नानंतर बदलतो. आणि माझ्या सास-यानं दिलेल्या पैशातूनच मला नोकरी मिळाली नाही तरी तुम्ही माझ्या आयुष्याचं वाटोळं

केलं होतं असं सांगून घर सोडून निघून जातो. हे सर्व प्रसंग भीमराव वाघचौरे यांनी प्रभावीपणे मांडले आहेत. ही सर्व भावंडे भगाचे आर्थिक शोषण करतात आणि आपल्या जीवनात स्थैर्य व सुरक्षितता निर्माण होताच भगाला सोडून जातात यावरुन त्यांच्या ठिकाणी असलेला स्वार्थीपणा, धूर्तपणाच दिसून येतो. ग्रामीण जीवनात येत असलेली ही नवी मूल्यव्यवस्था आणि जीवनपध्दती भीमराव वाघचौरे यांनी खूपच परिणामकारकतेने रेखाटली आहे. यातून ग्रामीण जीवनपध्दतीवर प्रकाशच पडतो.

या दोन्हीही कादंबरीमध्ये ग्रामीण भागातील लोकांच्या चांगुलपणावर जसा प्रकाश पडतो तसाच या चांगुलपणाचा फायदा घेणारी धूर्त, चाणाक्ष, स्वार्थी माणसे यांच्यावरही प्रकाश पडतो. ग्रामीण भागात संकटाच्या वेळी मदत करणारी माणसे असतात त्याचप्रमाणे फसवणारी सुध्दा माणसे असतात हे दिसते पण दामाच्या व भगाच्या आयुष्यात दारिद्र्य एवढे भयानक आहे की या प्रसंगात ते काहीच करु शकत नाहीत. आपली फसवणूक होते आहे हे लक्षात घेऊन सुध्दा ते काहीच करु शकत नाहीत. या सर्व प्रसंगाच्या मदतीने भीमराव वाघचौरे ग्रामीण जीवनपध्दती आपल्या समोर उभी करतात.

स्त्रियांच्या सहनशीलतेचे चित्रण :

हिंदू कुटुंब व्यवस्थेची चांगल्याप्रकारे जाण लेखकाला असल्याने कुटुंबातील नाते संबंध, कुटुंबात असलेले स्त्रियांचे स्थान, स्त्रीची सहनशीलता याचे चित्रण लेखकाने प्रभावीपणे केले आहे. हिंदू कुटुंब व्यवस्थेतील स्त्री आपले घर, आपला नवरा यांना सर्वस्व मानते. नव-याच्या सुखासाठी अहोरात्र कष्ट करते. वाट्याला येणारे, दुःख, भोग निमूटपणे सहन करते, कुठलीही तक्रार न करता सर्व त्रास ती सहन करते या सर्व गोष्टींचे भान भीमराव वाघचौरे

यांना आहे. त्यामुळे " रानखळगी " व " पाणघळी " या कादंब-यातील स्त्रियांच्या सहनशीलतेचे चित्रण त्यांनी योग्य प्रकारे केले आहे. या कादंब-यातील दामाची आई, आजी, परभा यांची जीवनपध्दती, त्या कोणकोणत्या दु:खाला सामोरे जातात याचे चित्रण प्रभावीपणे केले आहे.

" रानखळगी " या कादंबरीमध्ये दामाची आई ही अतिशय सहनशील स्त्री आहे. आपल्या नव-याला व घराला ती सर्वस्व मानते. तिची आपल्या मुलाने दामाने शिकावे ही तीची तळमळ आहे. म्हणून आपले जेवढे सहकार्य देता येईल तेवढे ती दामाच्या वडिलांना देते. येणा-या प्रत्येक संकटात ती नव-याच्या बरोबर राहते. दुष्काळाने परिस्थिती भयंकर होते तेव्हा ती सर्व दु:ख सहन करते. मोसंबीच्या बागाचे पैसे वाकडीचा पाहुणा घेऊन जातो तेव्हा ती खूप दु:खी होते. काही दिवस तणतण करते ती दायगावच्या तुलसा म्हातारीला म्हणते " वाटूळ झालं पुरतं आत्या बाये, घात झाला. आवं माजा सम्दा सवसार मोडून आन् लेकीचा सवसार जोडला हया म्हातारीनं .[२९] अशा उद्गारातून ती दु:ख करते पण ते काही दिवस टिकणारेच असते. परत ती पुन्हा आपल्या नव-याला मदत करते. आपल्या मुलाने शिकावे ही तिची धडपड आहे आपण जे सोसलं, भोगलं ते भोग मुलाच्या वाटयाला येऊ नयेत म्हणून ती दामाला म्हणते " आरं भाऊ, तुज्या नशीबी हये आसलं जीणं ना यावा म्हूनच आमचा जीव तुटतोय बग ! आमचं जीणं चाललयं मातीत पर, तुला आसले दिवस येऊ ने म्हूनच आमी कळकळतो.[30] या तिच्या उदगारातून ग्रामीण जीवनातील स्त्रीची सहन करण्याची वृत्ती आणि मुलासाठीचे असलेले प्रेमच दिसून येते. दामाच्या मॅट्रीकच्या परीक्षेच्या

फी साठी घरात एकमेव असलेली गाय आप्पा विकतात तेव्हा आईला खूप दुःख होते कारण ती गाय तिला आंदण म्हणून आलेली असते पण हे दुःख सुध्दा ती सहन करते. पोटासाठी गाव सोडण्याची वेळ येते तेव्हा सुध्दा ती खूप दुःखी होते. दामा बाहेरगावी शिकायला असतो त्याला आपण चांगले गोडधोड खाऊ घालू शकत नाही याचे दुःख तिला आहे. दामाला जेव्हा नोकरी लागते तेव्हा आईच्या चेह-यावर आनंदी भाव येतात. लेखक म्हणतो, " आन् धा वर्सात कधा हगितली न्हायी येवढी टवटवी आन् हूस्य आयेच्या तोंडावर दिसत व्हतं " [31] दहा वर्षात तिच्या तोंडावर कधीच सुखाचे भाव दिसले नाहीत. म्हणजे तिने किती सहन केले आहे हेच लेखकाला सुचवायचे आहे. दामाची आजीपण अशीच सहनशील आहे. अगोदर सुखात राहिलेली आजी दुष्काळाने जेव्हा आप्पांचा संसार मोडून पडतो तेव्हा परिस्थितीशी जमवून घेते. आप्पांच्या होरपळलेल्या संसारात आपली अडचण नको म्हणून आहे त्या परिस्थितीत ती जगते. कुटुंबातील कष्ट करणा-या लोकांच्या पोटाला अन्न मिळावे म्हणून ती उपासमार सहन करते. मुगाच्या बी भरणासाठी स्वतःच्या गळयातील मणी विकायला आप्पाकडे देते. ग्रामीण जीवनात गळयातील सोन्याच्या मण्याला फार महत्वाचे स्थान असते तरीपण हे दुःख ती सहन करते. म्हातारपणी खाण्याचे खूप हाल होतात तरी पण ती काहीच तक्रार करत नाही. आप्पाच्या बिकट परिस्थितीत त्यांना त्रास नको म्हणून औषधपाणी सुध्दा ती करत नाही. आपल्याला मरण आपल्या गावच्या मातीतच यावे ही तिची इच्छा असल्याने गाव सोडून जाताना ती खूप हळहळ करते. अशा अनेक प्रसंगातून भीमराव वाघचौरे यांनी स्त्रियांच्या सहनशीलतेचे वर्णन केलेले आहे.

भीमराव वाघचौरे यांनी " पाणथळी " या कादंबरीत सुध्दा " परभा" या भगाच्या बायकोच्या माध्यमातून स्त्रियांच्या सहनशीलतेचे प्रभावी चित्रण केले आहे. भगाच्या दुःखद जीवनात ती शेवटपर्यंत साथ देते. आपल्या नव-याला संसारात मदत करणे, त्याच्या सुख-दुःखात वाटेकरी होणे, नव-याची जबाबदारी पेलण्याचा प्रयत्न करणे अशी शेतमजूराच्या बायकोच्या वाटयाला येणारी सर्व दुःख व कष्ट ती सहन करते ती आदर्श स्त्री होण्या-ऐवजी पारंपरिक मूल्यांना प्रमाण मानणारी स्त्री बनते. परभाला घालायला कपडे नसतात भगाला ती सांगते पण भगा आपल्या भावंडासाठी वहया पुस्तके घेऊन येतो तेव्हा ती खूप दुःखी होते पण हे सुध्दा ती सहन करते. भगाला मदत करण्यासाठी ती दिवसभर कष्ट करते आणि रात्रीसुध्दा भगाच्या येण्याची वाट पहात बसते ती म्हणते " दिवसभर काम वढावं आन रातीलाबी सम्धायचं आवरुन बसावं ताटकळत ."[32] या तिच्या उद्गारातून ग्रामीण जीवनातील स्त्रियांची सहनशीलताच दिसून येते. परभाच्या माध्यमातून ग्रामीण स्त्रियांच्या सहनशीलतेचे, सोशिकतेचे प्रातिनिधिक चित्रण भीमराव वाघचौरे यांनी केले आहे. परभा बाळंतपणात मरणाच्या दारातून परत येते. बाळंतपणात सुध्दा तिला गोडधोड खायला मिळत नाही. बाजरीच्या पेजवनावर ती दिवस काढते असे कष्टदायक प्रसंग सुध्दा ती सहन करते. आपण व आपल्या नव-याने आयुष्यभर कष्ट करुन दिना, जगू व शांती यांना मार्गी लावले पण भगा आजारी पडल्यावर कोणीच मदतीला येत नाही हे दुःख सुध्दा ती सहन करते ती म्हणते, " बाकीच्या येळचं सोडून द्या पण आज दोन म्हयन्या-पासून भाऊ दयेमार मन्ल्यावर एकालाबी कायी आठवुनी का ? "[33] या तिच्या उद्गारातून तिच्या मनात असलेली खंत, दुःखच प्रकट होते. परभाच्या या सहनशीलतेचे प्रभावी चित्रण भीमराव वाघचौरे यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील स्त्री जीवनाचे, त्यांच्या व्यथांचे दु:खाचे सहनशीलतेचे प्रभावी चित्रण दामाची आई, परभा व आई या स्त्रियांच्या माध्यमातून लेखकाने केले आहे. परंपरागत हिंदू स्त्रीचे स्वभाववैशिष्टय आणि जीवनपध्दतीचे चित्रणच त्यातून प्रकट होते.

शिक्षणासाठी दामाची धडपड :

" रानखळगी " ही कादंबरी प्रामुख्याने दुष्काळी पार्श्वभूमीवर लिहलेली असल्याने या कादंबरीत शेतक-याची अवस्था कशी भीषण होते याचे चित्रण आले आहे. संसाराची पडझड झालेल्या अशाच एका कुटुंबातील दामा आपले शिक्षण कसे पूर्ण करतो याचीच ही कथा आहे. दामाची शिक्षणासाठीची धडपड आपल्याला दिसून येते.

अ. शाळेतील अडचणी :

इतर शेतक-यांची व त्यांच्या मुलाची शिक्षणासाठी कशी परवड होते तशीच दामाची पण होते. घरची परिस्थिती अत्यंत खराब आहे . आपण शिकावं, नोकरी मिळवावी आणि घरच्यांना सुखात ठेवावं ही दामाची धडपड आहे. दामाला शाळेसाठी दोन कोसावरच्या गारखेडला जावे लागते. त्यामुळे त्याला खूप त्रास होतो. पाऊस, ऊन, वारा याचाही त्याला खूप त्रास होतो. एकदा पाऊस येत असताना चिखलात दामाला काटा मोडतो त्यावेळेचे त्याच्या वेदनेचे वर्णन खूपच हृदयवेधक आहे " मी कळ दाबीत रहातो तसाच पळत रहतो. पाय असा खाली टेकता येत नव्हता. निम्तीच शिरहारी रग लागली रहती. पाय जड पडला रहता. जीव रस्ताळत रहता. वरुन पाऊस पडत रहता".[34] अशा प्रसंगातून शाळा शिकत असताना दामाला कोणत्या-कोणत्या प्रसंगाला तोंड दयावे लागते याचे वर्णन येते. मॅट्रीकच्या परीक्षेची फी भरण्यासाठी दामाच्या वडिलांकडे पैसे

नसतात तेव्हा घरातली एकमेव असलेली गाय ते विकतात. घालायला व्यवस्थित कपडे नाहीत. वह्या-पुस्तके नाहीत, पायात चपला नाहीत तरीही दामा शाळेचे शिक्षण पूर्ण करतो. मॅट्रीक पास होतो. दामाचे हे चित्रण एकट्याचे नाही तर संपूर्ण शेतक-यांच्या मुलाचे ते प्रातिनिधिक चित्रण आहे.

ब. कॉलेजमध्ये शिक्षणात दामाची झालेली परवड :

दामा मॅट्रीक पास होतो आणि वैजापूरला कॉलेजला प्रवेश घेतो. इतर ग्रामीण मुलांसारखाच तो पण गोंधळलेला असतो. आपल्या घरची परिस्थिती वाईट आहे. आपल्या घरी एकवेळचे जेवण कसे तरी मिळते मग कॉलेज शिक्षणाचा खर्च आपल्याला झेपेल का ? अशा दडपणाखाली तो वावरतो. दामा बोर्डिंगमध्ये राहतो पण त्याची फी भरण्याची सुध्दा त्याची ऐपत नसते म्हणून तो सभापतीची चिठ्ठी आणतो आणि फी माफ करुन घेतो. व्यवहाराचा आणि शिक्षणाचा काहीच परस्पर संबंध नाही हे त्याच्या लक्षात येते. परीक्षेची फी भरायला दामाजवळ पैसे नसतात तशातच गाव सोडून दामाचे वडील व आई शेजारच्या वाण्याच्या मळ्यात काम करायला गेलेले असतात त्यावेळेस दामाच्या मनस्थितीचे वर्णन निवेदनातून लेखकाने केले आहे. " मन भरुन येत व्हतं उर दबता दबत न्हवतं. सम्धा-यची तातातूट व्हत व्हती मन इघरत इतळत चाललं व्हतं डोळ एक-सारखं पाजरत व्हतं एक मन हिंमत देत व्हतं दुसरं मन दुबळं बनवित व्हतं. "[35] अशा परिस्थितीतसुध्दा दामा आपली शिकण्याची धडपड चालूच ठेवतो. तशातच आजी मरण पावते. अशी एक एक संकटे येतात तरी दामा शिकत राहतो. परीक्षेच्या फी साठी जयवंता-कडून पैसे घेतो व राहिलेली फी प्राचार्यांना अर्ज करुन माफ करुन घेतो. अशा परिस्थितीत दामाची मानसिक स्थिती दुबळी बनते व तो

पी. यु. सी. ला नापास होतो. तेव्हा आप्पा त्याला खूप रागावतात. दामा जयवंताच्या शेतात सालानं कामाला राहतो. परत गिरासेभाऊंच्या मदतीने खुलताबादला व कन्नडला एम. एस. ई. बी. मध्ये लेबर काम करतो खूप कष्ट करतो व घराला मदत करतो. अभ्यास करुन पी. यु. सी. चा राहिलेला पेपरमध्ये पास होतो. अशाप्रकारे कॉलेजमधील जीवनात दामाची परवड झालेली आहे.

क. प्राचार्यांची मदत :

दामा पी. यु. सी. ला पास झाल्यानंतर कॉलेजमध्ये प्रवेश घेतो. परंतु घरची परिस्थिती अत्यंत खडतर असल्याने आपले कॉलेजचे शिक्षण पूर्ण होईल की नाही याबद्दल त्याच्या मनात शंकाच असते पण कॉलेजमध्ये प्राचार्यांच्या रुपाने त्याला देवमाणूस भेटतो. प्राचार्य हरप्रकारे त्याला मदत करतात पणही मदतही दामाला फुकट मिळत नाही तर तो कष्टदायक काम करतो. झाडाचे खड्डे खोद, झाडांना पाणी घाल, बोर्डिंगमध्ये पिण्याचे पाणी भर, असली कामे करतो. शिक्षण घेत असताना दामाच्या वाट्याला आलेले भोग तो शांतपणे भोगतो आणि आपले शिक्षण पूर्ण करणे एवढेच ध्येय समोर ठेवतो. दामाच्या ठिकाणी असलेल्या शिक्षणाच्या तळमळीने प्राचार्य ही त्याला मदत करतात. जीवनामध्ये स्वतः:च्या पायावर उभे राहण्यासाठी खैरात दिल्यासारखी मदत ते देत नाही तर त्यांच्याकडून काहीतरी काम करुन घेतात. दोन वर्ष तो ग्रंथालयात काम करतो. परीक्षेच्या वेळी कॉलेजची अभ्यासिका चालवतो व त्या मोबदल्यात येणाऱ्या पैशातून आपले शिक्षण पूर्ण करतो. गरीब विद्यार्थ्यांना तळमळीने मदत करण्याची वृत्तीच प्राचार्यांच्याकडे दिसून

त्यामुळेच दामा आपले शिक्षण घेऊ शकतो.

ड. जनार्दन स्वामींच्या आश्रमात :

दामा बी. ए. प्रथम वर्षाची परीक्षा झाल्यावर सुट्टीमध्ये औरंगाबादला लायब्ररी कोर्स करण्यासाठी जातो. घरची बिकट आर्थिक परिस्थिती त्यामुळे औरंगाबादला राहण्याची आणि खाण्यासाठी काम करावे हा त्याच्यापुढे प्रश्न असतो. गिरासेभाऊ व गावातील लोक वर्गणी करुन काही पैसे त्याला देतात. गिरासे-भाऊच्या ओळखीने दामाची जनार्दन स्वामीच्या आश्रमात राहण्याची सोय होते. पण त्या आश्रमात दामाची भयंकर उपासमार होते. उपासमारीमुळे दामाला भयंकर मानसिक त्रास होतो. लायब्ररी कोर्सचे शिक्षण सोडून देण्याचे तो ठरवतो पण परत त्याला आपले गावाकडचे दिवस आठवतात. आपल्या आई-वडिलांची आपण शिकावे म्हणून किती तळमळ आहे हे त्याला आठवते. आई-वडिलांनी आपल्या शिक्ष-णासाठी किती यातना भोगल्या आहेत हे त्याच्या लक्षात येते. शेवटी उपासमारीने आणि मानसिक त्रासाने वैतागलेला दामा आश्रमातल्या मंदिरात जातो आणि पिंडीवर डोकं ठेवतो व म्हणतो " देवा, आता, तुज्याच पायी येऊन पडलोय, गंज हाळाकळा सोसल्या, आता कुठवर आन्तं पहातोस ".[36] आईने दिलेल्या भाकरी चार दिवस दामा पुरवतो. भाकरी विटल्या तरी टाकून देण्याची त्याची इच्छा होत नाही तो विटलेल्या भाकरी खातो तो प्रसंग तर हृदयाला पीळ पाडणारा आहे.

ई) हॉटेल अशोकामध्ये नोकरी :

" रानखळगी " या संपूर्ण कादंबरी मध्ये दामाची शिक्षणासाठीची धडपडच दिसून येते. जनार्दन स्वामीच्या आश्रमात उपासमारीने हबकून गेलेला दामा औरंगाबाद शहरात नोकरी मिळविण्यासाठी धडपड करतो. आपल्याला जमेल अशी नोकरी फक्त हॉटेलमध्येच मिळेल म्हणून

तो प्रत्येक हॉटेलमध्ये जाऊन नोकरी मागतो पण त्याच्या कोणेच ओळखी नसल्याने त्याला नोकरी मिळत नाही. काही काही हॉटेल मालक तर कुत्र्याला हाकलून देतात त्याप्रमाणे त्याला हॉटेल बाहेर घालवतात. त्यावेळच्या दामाच्या मन:स्थितीचे सुरेख चित्रण लेखकाने केलेले आहे. दामा म्हणतो " ग्रंथ म्हणजे गुरु आन् ग्रंथ म्हणजे ज्ञानभांडार तेच माणसाला माणूस बनवित असतं. माणुसकी शिकवित असतं. माज्या नदरंपुढं एकेक हॉटेल मालक येत होते." [37] या प्रसंगातून दामाच्या खराब मन:स्थितीचे दर्शन होते. शेवटी दामाला गिरासेभाऊंच्या मदतीने हॉटेल अशोकामध्ये नोकरी मिळते. दामा हॉटेलमध्ये फरशी पुसण्याचे, कप-बशा धुण्याचे काम करतो आणि आपला लायब्ररी कोर्सचा अभ्यासक्रम संपवतो. यासर्व प्रसंगातून दामाची शिकण्याची धडपड दिसून येते आलेल्या प्रत्येक संकटावर दामा इतरांच्या मदतीने मात करतो आणि आपले शिक्षण पूर्ण करतो.

लायब्ररी कोर्स झाल्यानंतर दामा प्राचार्यांच्या सांगण्या-प्रमाणे परत कॉलेजमध्ये प्रवेश घेतो. कॉलेजमध्ये काम करुन आपले पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करतो. शेवटी प्राचार्य त्याला कॉलेज मध्येच नोकरी मिळवून देतात. दामाची शिक्षण घेण्यासाठीची धडपड खूपच उठावदारपणे आणि परिणामकारकतेने लेखकाने प्रकट केली आहे व ग्रामीण भागातील तरुण शिक्षण घेत असताना कशा प्रकारच्या अडचणींना तोंड देतो याची जाण भीमराव वाघचौरे यांना असल्याने दामाची शिक्षणासाठीची धडपड त्यांनी योग्यप्रकारे चित्रित केली आहे.

घर सावरण्यासाठी भगाची धडपड :

" पाणधळी " ही कादंबरी शेतमजूराच्या दुःखाचे चित्रण करणारी कादंबरी आहे. त्यामुळे शेतमजुराच्या वाट्याला येणारे दुःख, दारिद्र्य, उपासमार यांचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत आले आहे. बापाच्या मरणानंतर घर सावरण्याची जबाबदारी भगावरती येते. घर सावरण्यासाठी भगा कशाप्रकारच्या संकटाना तोंड देतो याचे वास्तववादी चित्रण या कादंबरीत भीमराव वाघचौरे यांनी केले आहे.

अ. भगावर आलेली कुटुंबाची जबाबदारी :

तिरमक-भगाचा बाप विहीर फोडण्याचे काम करणारा मजूर असतो. दिनाच्या-भगाचा सर्वात धाकटा भाऊ यांच्या जन्मानंतर भगाची आई मरण पावते. तिच्या मागे आपल्या परीने आईची माया देऊन भगाचा बाप सर्वांचा सांभाळ करत असतो. परंतु दरिद्री परिस्थितीमुळे तो भगाला चौथीपर्यंतचे शिक्षण अर्धवट सोडून देऊन आपल्या बरोबरच कामाला लावतो. अशाच एका उन्हाळ्यात विहिरीचे काम करत असताना झालेल्या अपघातात भगाचा बाप जबरदस्त जखमी होतो. जखमी अवस्थेतील तिरमक भगाला म्हणतो, " भगा, माजं आता ...आटपल्यालंय,सम्दं संबाळ. पोरीचं लगन... पोरं शिकवं, कायीबी करून नवकरीला लाव."[38] असं वचन घेऊन भगाचा बाप मान टाकतो. अचानक आलेल्या संसाराच्या ओझ्यानं भगा गोंधळून जातो. त्यावेळेस शाळेपासूनचा दोस्त भगाला सावरण्यासाठी मदत करतो. त्याला आधार देतो. आधार देत असतानाच

जबाबदारीची आठवण ही करुन देतो. मन्सुब म्हणतो " उगा! चुप! येडा का हायेस भल्या मान्सा तू ? आय बाप का जल्माला पुरत आसतेत का ? आसली दुःखे सम्द्यायच्याच माथी आसल्यात फक्त कोणाच्या माथी लवकर तर कोणाच्या उशिरानं,आता झालं गेलं इसरुन म्होरचं बग. सोताला सावर म्होरचं सम्दंच कच्चय आजून तुलाच पक्क करायचं. आता त्वाच आशी हिंमत सोडली तर त्या वयनीला आन् भावा-बहयनीला कोणी रं सावरावं ? उठ, पुस डोळं "३९ या मन्सुबच्या बोलण्याने भगा सावरतो अन् नव्या उमेदीने घराकडे येतो. या संपूर्ण प्रसंगात ग्रामीण शेतमजूराच्या आर्थिक व मानसिक दुःखाचेच चित्रण येते.

ब. शांतीचे-बहिणीचे लग्न करणारा भगा :
-----------------------------------

बापाला दिलेल्या वचनाची भगाला सारखी आठवण येत असते. बापाच्या वचनातून मुक्त होण्यासाठी तो धडपड करत असतो. आपला संसार आणि भावडांना मार्गी लावण्यासाठी अहोरात्र कष्ट करतो. त्याची बायको परभा पण त्याला मदत करीत असते. भगाला चार बिघे जमिनीचा कोरडवाहू तुकडा असतो. आपले शेत घरी कसणे भगाला शक्य नसते त्यामुळे तो ते गजा थोरातला बटईनं कसायला देतो. याचवेळी मन्सुब शांतीसाठी किनगावचे स्थळ सुचवितो. स्थळ आपल्या हातातले आहे, हा लग्नाचा खर्च तुला कधीतरी करावाच लागणार आहे त्यामुळे काही विचार न करता पक्कं कर म्हणून सांगतो त्यावेळी भगा म्हणतो, " आता मी तरी आणिक कसला इचार करणार ? म्या आता उभा राहयलोच तर सम्दं तुज्या बळावर समज. तुजीच बहीण समजून लाव बाबा हात येऊ दे पाव्हणो"४० पण जेव्हा लग्नाला दीड-दोन हजार रुपये

खर्च येणार म्हणून भगा काळजीत पडतो. आणि घरची जीवापाड सांभाळलेली सगळी शेरडं विकतो व शांतीचे लग्न करतो. अशा प्रसंगातून भगाच्या व्यक्तिमत्वावर चांगला प्रकाश पडतो. बहिणीच्या सुखासाठी चाललेली भगाची धडपडच दिसून येते.

क. जगूला नोकरीला लावतो :

भगाचा लहान भाऊ जगू हा जरा तिरसट डोक्याचा असतो तो शाळा व्यवस्थित शिकत नाही. बापाच्या मागे आपला मोठा भाऊ आपल्यासाठी एवढे कष्ट उपसतो याची जाणिव जगूला नाही जगू नेहमी भगाला व परभाला उलट बोलतो याचे दु:ख भगाला असते पण एकीकडे आपण आपल्या भावंडाना हवे ते देऊ शकत नाही हे पण शल्य त्याला टोचत असते. जो पंडा पाटील भगाला त्रास देत असतो त्याच्याच पोराबरोबर जगू फिरत असतो यामुळे भगाला दु:ख होते. जगू दारु पिऊन आल्याने भगा त्याला मारहाण करतो. जगू पळून जातो. जगू दुर्गुणी, वाईट संगतीतला असला तरी त्याच्यासाठी खस्ता खाणे ही त्याला स्वत:ची जबाबदारी वाटत असते. त्यामुळे स्वत:च्या बायकोच्या दु:खाकडे दुर्लक्ष करुन त्याच्यासाठी तो नवीन पुस्तके- वहया घेऊन येतो. असा हा जगू लग्न झाल्यावर सुधारेल व नोकरी लागल्यावर ताळयावर येईल या हेतूने त्याच्या नोकरीच्या कामाला लागणाऱ्या दोन हजार रुपयांसाठी भगा आपले शेत पंडा पाटील यांच्याकडे गहाण ठेवतो. मध्यंतरी जगूचे लग्न करतो. लग्न झाल्यावर सुध्दा जगूचा ऐतखाऊपणा संपत नाही. लग्न झालेल्या जगूला त्याच्या बायकोसह पोसणे भगाला असहय होते तो म्हणतो, " कायी तरी कर. कायी तर बग पोटापाण्याचं आपुन काय कोणी तालेवार न्हवत आयतं बसून खायला आमी दोघायनं तरी कवर वढावं रं ? आरं आठवतं तसं वढतोय" [41] तेव्हा जगू भगाला उलटे बोलतो.

भगा जगूला मारहाण करतो. व जगू घर सोडून निघून जातो. जगूला नोकरी लागते व भगाची एक जबाबदारी पूर्ण होते.

ड. दिनाला मार्गी लावतो :

जगू व शांतीच्या जबाबदारीतून भगा कसातरी मुक्त होतो. कसे का असेना पण दोघे मार्गाला लागले. याचं थोडफार समाधान असतानाच दिनूच्या भवितव्याचा विचार भगाच्या मनात येऊ लागतो. दिनालासुध्दा कुठेतरी नोकरीला लावावे असे त्याला वाटू लागते. त्यासाठी गरज पडल्यास घरसुध्दा गहाण ठेवण्याची त्याची तयारी असते. घर सावरण्यासाठी भावंडाना मार्गी लावण्यासाठी भगाची विलक्षण धडपड या कादंबरीत दिसून येते. पण दिनाचे सासरे काही न बघता मुलगी दयायला तयार होतात. दिनाला नोकरीला लावायचा खर्च सुध्दा ते करतात व दिनाचे लग्न होते. नोकरीही मिळते. सुरुवातीला दिनाही वरकरणी भगाच्या दुःखात, कष्टात सामील होत असतो. पण भगाने बापकमाईची जमीन फक्त जगूसाठी वापरली आणि आपल्या साठी काहीच मागे ठेवले नाही असे त्याला वाटत असते. तो भगाला म्हणतो " आनू त्या पाटहन्यानं पदरचा पयसा खरचं करुन नवकरीला नसतं लावून दिलं तर ! पार वाटूळ केलं व्हतं तुमी तर माजं ! "[४२] आपल्या भविष्याचा भगाने काहीच विचार केला नाही असे त्याला वाटते व शेवटी तो सुध्दा भगाला सोडून निघून जातो.

आपले सर्व घर मार्गी लागावे म्हणून भगा आयुष्यभर धडपड करतो पण ज्या भावंडासाठी तो खस्ता खातो ते भाऊ-बहीण आप-आपल्या जीवनात सुरक्षितता व स्थैर्य निर्माण झाल्यावर त्याला एकाकी करुन सोडून जातात. भावंडाच्या सुखासाठी तो आपल्या संसाराची परवड करुन घेतो व त्यातच मरण पावतो व

मरताना सुध्दा आपले शेत दोन भावाच्या नावावर करुन जातो. घर सावरण्यासाठी चाललेली ही भगाची धडपड भीमराव वाघचौरे यांनी फारच वास्तवपणे व परिणामकारकतेनी रेखाटली आहे. शेवटी, केवळ दुस-यांसाठीच जगलेला भगा हताशपणे मृत्यूला सामोरा जातो.

## शेतकरी कुटूंबातील प्राण्यांचे स्थान :

" रानखळगी " व " पाणखळगी" या कादंब-या ग्रामीण वातावरणाचे चित्रण करीत असल्याने या कादंब-यातून ग्रामीण लोकांचे दुःख, दारिद्र्य, त्यांची जीवन जगण्याची पध्दती, रुढी, परंपरा, त्यांच्या जीवनात असलेले निसर्गाचे स्थान, प्राण्यांचे स्थान यांचे पण चित्रण आले आहे. " रानखळगी " या कादंबरीतून तर ते अधिकच परिणामकारकतेने व उठावदारपणे आले आहे. " पाणघळी" ही कादंबरी एका शेतमजूराच्या जीवनावरची असल्याने त्यामध्ये प्राण्यांबद्दलचे प्रसंग फार कमी आहेत.

" रानखळगी " या कादंबरी मध्ये दामाच्या कुटूंबामध्ये प्राण्यांना फार मोठे स्थान आहे. दामाचे कुटूंब हे छोटे शेतकरी असतात त्यामुळे त्यांच्याकडे सगळा बैल-बारदाणा असतो पण दुष्काळाच्या संकटामुळे दामाच्या वडिलांचा संसार पुरता मोडून पडतो. काम मिळत नाही, काम नसल्याने पोटाला खाण्याची त्याची पंचाईत होते तेव्हा माणसाला खायला नसल्याने तसेच संसारात येणा-या अडचणीला तोंड देण्यासाठी दामाचे वडील -आप्पा एक एक जनावर विकायला काढतात त्यावेळच्या प्रसंगाचे चित्रण लेखकाने सुरेख केलेले आहे. दामाच्या मॅट्रीकच्या परीक्षेच्या फी साठी आप्पा घरातली एकमेव गाय विकतात तेव्हा दामाची आई म्हणते

" निदान मला तरी खळ्यापवतर बोलवायचं व्हतं. आपून काय आजच हाळदी-कुंकावाचून गोलो व्हतो का ? निदान तांब्याभर पाणी तरी जाण्याखेपी तिच्या पायावर पडलं आसतं. पसाभर दाणे तिच्या तोंडात पडले आसते "[४३] घरची गाय ही लक्ष्मी असते. आणि घरातली लक्ष्मी तशीच कोरडी गेली याचे दुःख तिला होते. ग्रामीण संस्कृतीत असलेले संकेत परंपरा आणि प्राण्याचे त्यांच्या जीवनात असलेले स्थान कसे आहे हे आपल्या लक्षात येते. जेव्हा घरच्या बैल जोडीतील सुकड्या विकायचा आहे याची वार्ता दामाच्या आईला कळते तेव्हा ती आप्पाला म्हणते " नका इकू वं ! घरच्या गाचीचंय बाळपणाचे कष्ट केलेत त्यानं. आता म्हतार-पणी तरी त्याला मातीची हेळणा नका करू. मरु द्या खुट्यावरच "[४४] या उद्गारातून प्राण्यांवर असलेले आईचे प्रेमच दिसून येते. जेव्हा घरची परिस्थिती खूपच बिकट होते खाण्याची सुध्दा उपासमार होते तेव्हा आप्पा सुकड्या विकायला नेतात आणि विकल्यानंतर आपाच्या मनस्थितीचे वर्णन लेखकाने केले आहे. " तसे आप्पा सुकड्याच्या म्होरुन झाले. त्याच्या कपाळा-डोक्यावरुन हात फिरवला खाली बसत त्याच्या पायाला हात लावून पाया पडल्यागत केलं आनू उभं राहताना तशीच सुकड्याच्या मानंला कवळ घातली मला कवरभर आप्पाचं निस्तच गदगदतं अंग दिसत व्हतं."[४५] यावर्णनामधून ग्रामीण लोकांचे आपल्या प्राण्यांवर किती प्रेम असते हे दिसून येते. तसेच पाक-या बैल मरतो तेव्हा आप्पाच्या मनस्थितीचे वर्णन लेखकाने केले आहे. " मग आप्पा पाक-याच्या तोंडाम्होरं झाले. खाली बसून खिशातली कसलीतरी पुडी काढली. तिच्यातून हळद-कुकू काढून पाख-याच्या कपाळी लावलं गुळाचा खडा काढून त्याच्या तोंडात घातला "[४६] या सर्व प्रसंगातून ग्रामीण लोकांचे आपल्या प्राण्यावरील प्रेमाचेच दर्शन होते. ग्रामीण लोकांची मने आपल्या जनावरामध्ये खूप गुंतलेली असतात. आणि हाच धागा भीमराव वाघचौरे यांनी कथानकाभोवती गुंफला

आहे.

" पाणघळी " या कादंबरीमध्ये जेव्हा शांतीचे लग्न जमते. शांतीच्या लग्नाच्या खर्चासाठी भगा काळजीत पडतो. तेव्हा शांतीच्या लग्नासाठी आपल्या घरची सर्व शेरडं तो विकायचे ठरवतो तेव्हा भगाची बायको परभा म्हणते " कावं, पुरता खुटा मोड करायलेत तुमी तर एखादं पाठरु तरी राहू दया" [४७] ग्रामीण भागात जनावरांचा सगळा खुटा मोकळा करणे हे अपशकुनाचे लक्षण समजले जाते तेव्हा भगा बायकोच्या इच्छेखातर एक पाठरु बाजूला काढून ठेवतो. बापाच्या दहाव्या-तेराव्याच्या खर्चासाठी भगाने पंडा पाटलांकडून कर्ज काढलेलं असते व त्याबदल्यात शेरडं लिहून दिलेली असतात. शेवटी कर्जासाठी पंडा ती शेरडं ओढून घेऊन जातो. अशाप्रकारे ग्रामीण जीवनात प्राण्यांचे फार मोठे स्थान असलेले आपणाला दिसून येते.

ग्रामीण संस्कृतीत प्राण्यांचे कुटुंबातील स्थान फार निकटचे असते. त्या प्राण्यांच्या जीवावरच यांचा संसार चालू असतो त्यामुळे अशा एखादया प्राण्याचा मृत्यू झाला अथवा त्यांना विकावे लागले तर ग्रामीण लोकांना फार दुःख होते. आपल्या कुटुंबातीलच कोणी-तरी मृत्यू पावले आहे असे दुःख ते व्यक्त करताना दिसतात. प्राण्याचे असे अनेक प्रसंग कथानकाच्या भोवती उभे करुन भीमराव वाघचौरे यांनी कादंब-यात वास्तवता आणली आहे. हे प्रसंग खरे वाटावेत इतक्या परिणामकारकतेने चितारलेले दिसून येतात व यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबात प्राण्याचे स्थान कसे आहे हे दिसून येते.

समारोप :
--------

" रानव्हळगी " व " पाणघळी " या कादंब-यातील जीवन चित्रण पहात असताना ग्रामीण जीवनातील लोक कशाप्रकारच्या

भयानक दु:खात, दारिद्र्यात जगत आहेत हे लक्षात येते. ग्रामीण लोकांच्या जीवनाला कसली ही सुरक्षितता नाही. त्यांच्या संसाराला कसलेही स्थैर्य नाही हे दिसून येते. शिक्षण घेण्यासाठी दामाला कशा प्रकारचे त्रास सोसावे लागतात आणि घर सावरण्यासाठी भगाला किती संकटाला तोंड दयावे लागते याचे चित्रण या कादंब-यातून येते.

" रानखळगी " या कादंबरीतून दामाच्या कुटुंबाचे चित्रण खूपच परिणामकारक आले आहे. निसर्ग आणि मानव यांच्या संघर्षात माणूस किती हतबल होतो आपले कुटुंब सांभाळण्यासाठी त्याला किती अनंत अडचणीला तोंड दयावे लागते हे दिसून येते. निसर्गाच्या लहरीप्रमाणे एका फटक्यात तो ग्रामीण जीवनाची कशी वाताहात करतो याचे चित्रण आलेले आहे अशा बिकट परिस्थितीत सुध्दा दामाचे आई वडील त्याला शिक्षणासाठी प्रेरणा देतात तू शिकला तरच तुला सुखाचे दिवस येतील हे सांगतात. इतर कुटुंबात असतात तसे भावनिक संघर्ष दामाच्या कुटुंबात सुध्दा आहेत पण मूळ संघर्ष मात्र निसर्ग आणि परिस्थितीशीच असलेला दिसून येतो.

" पाणघळी " या कादंबरीमध्ये सुध्दा भगाच्या कुटुंबाचे चित्रण स्थूलमानाने आले आहे. बापाच्या मृत्यूनंतर भगाच्या खांदयावर कुटुंबाची जबाबदारी येते आणि घर सावरण्यासाठी भगाची चाललेली धडपडच दिसून येते. भावडांना मार्गी लावताना भगाचा स्वत:चा संसार होरपळून जातो अशी व्यथा घेऊन जगणारा भगा भीमराव वाघचौरे यांनी समर्थपणे उभा केला आहे.

या कादंब-यातून दारिद्र्याचे चित्रण खूपच प्रभावी केलेले आहे. ग्रामीण संस्कृतीतील लोकांच्या माथी दारिद्र्य पाचवीलाच पुजलेले असते. दारिद्र्याने येणारी अनेक दु:खे संकटे हे लोक कसे पचवतात हे पाहून मन भरुन येते. पोट भरण्यासाठी दामाच्या

कुटुंबाला गाव सोडावे लागते. जनावरे विकावी लागतात. शिक्षण घेण्यासाठी कष्ट करावे लागते. खाण्यासाठी कुत्र्या-सारखे जीवन जगावे लागते. असे दारिद्र्याचे अनेक प्रसंग येतात. भगाला सुध्दा बहीणीचे लग्न करण्यासाठी शेळ्या, विकाव्या लागतात, भावाच्या नोकरीसाठी शेत गहाण ठेवावे लागते. बापाच्या दहाव्या-तेराव्या साठी कर्ज काढावे लागते हे लोक दारिद्र्यात जगतात पण  जगण्याची त्यांची जिद्द खूपच प्रभावी-पणे मांडली आहे.

शिक्षणासाठी दामाची धडपड " रानवळगी " या कादंबरीमध्ये भीमराव वाघचौरे यांनी प्रभावीपणे मांडली आहे. अनेक संकटे येऊन सुध्दा दामा आपले शिक्षण पूर्ण करतो. कष्टदायक परिस्थितीत सुध्दा शिक्षण अर्ध्यावर सोडत नाही ही त्याची धडपड चांगली चित्रित केली आहे.

" पाणघळी " मध्ये घर सावरण्यासाठी भगा आपल्या संसाराची होळी करतो. त्याची भावंडे जीवनात स्थैर्य निर्माण होताच त्याला सोडून जातात पण भगा मात्र आपल्या भावंडासाठी आयुष्यभर धडपड करतो व शेवटी त्यांच्या संसाराचीच परवड झालेली दिसून येते.

या दोन्ही कादंबऱ्यामध्ये संकटकाळी नायकाला अनेकांची मदत झालेली दिसते. आपला चांगुलपणा, मदत करण्याची वृत्ती इतरांना सांभाळून घेण्याची प्रवृत्ती घेऊन जगणारी माणसे खेडया - पाडयातून आजही दिसतात हे जयवंता, प्राचार्य, मन्सुब, गिरासेभाऊ या लोकांकडून समजते. ग्रामीण भागात कुटुंबामध्ये प्राण्यांचे स्थान किती जवळचे आहे हे पण दिसून येते. आपल्या प्राण्यांवर हे लोक किती जीवापाड प्रेम करतात हे या कादंबऱ्यातून दिसून  येते.

दलितापेक्षाही भयानक जीवन जगणारा एक दलितेतर समाज ग्रामीण भागात आढळतो. त्याचे दुःख व्यथा जीवनपध्दती ही दलितासारखीच आहे फक्त नावालाच त्यांची जात आणि कूळ मोठे आहे या सर्व लोकांच्या जीवनाचे प्रभावी चित्रण भीमराव वाघचौरे यांनी केलेले आहे. म्हणूनच दलितेतर जीवनातील समस्या अधिक सुक्ष्मतेनेच व परिणाकारकतेने मांडण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी ठरला आहे यामुळे 'रानखळगी' व 'पाणघळी' या कादंब-या एकूणच ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात उल्लेखनीय ठरल्या आहेत.

एकूणच या कादंब-यातून ग्रामीण जीवनपध्दतीवर भीमराव वाघचौरे यांनी खूपच प्रभावीपणे प्रकाश टाकला आहे.

## प्रकरण दूसरे

### संदर्भ टीपा


| | | |
|---|---|---|
| १. | वाघचौरे, भीमराव | " रानखळगी "<br>साकेत प्रकाशन, औरंगाबाद<br>प्रथमावृत्ती, १९८८ पृ. १७ |
| २. | तत्रैव | पृ. ६४ |
| ३. | वाघचौरे, भीमराव | " पाणघळी "<br>साकेत प्रकाशन, औरंगाबाद<br>प्रथमावृत्ती, १९९४ पृ. ७ |
| ४. | तत्रैव | पृ. १७ |
| ५. | शिंदे, विश्वनाथ | दलितेतर तरुणाच्या वेदनेची कथा<br>: रानखळगी<br>साहित्य समन्वय, धारवाड,<br>मे, जून जुलै १९९५, पृ. ३ |
| ६. | वाघचौरे, भीमराव | " रानखळगी "<br>साकेत प्रकाशन औरंगाबाद<br>प्रथमावृत्ती, १९८८ पृ. ६६ |
| ७. | तत्रैव | पृ. ५४ |
| ८. | शिंदे, विश्वनाथ | उनि पृ. १ |

९. वाघचौरे, भीमराव " रानझळगी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९८८ पृ. ८७-८८

१०. तत्रैव पृ. ८०

११. तत्रैव पृ. १५९

१२. तत्रैव पृ.

१३. वाघचौरे, भीमराव " पाणघळी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९९४ पृ. ७

१४. तत्रैव पृ. ७

१५. तत्रैव पृ. १२

१६. तत्रैव पृ. २०

१७. तत्रैव पृ. ३५

१८. तत्रैव पृ. ७४

१९. तत्रैव पृ. ९५

२०. वाघचौरे, भीमराव " रानझळगी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९८८ पृ. १६५

२१. तत्रैव पृ. १४१

२२. वाघचौरे, भीमराव " पाणघळी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती १९९४, पृ. ९

२३. तत्रैव पृ. २८

२४. तत्रैव पृ. २८

२५. तत्रैव पृ. ३८

२६. वाघमारे, भीमराव " रानखळगी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९८८ पृ. २९

२७. तत्रैव पृ. ३०

२८. वाघमारे, भीमराव " पाणघळी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९९४, पृ. ७४

२९. वाघमारे, भीमराव " रानखळगी ।
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९८८ पृ. ३३

३०. तत्रैव पृ. ५५

३१. तत्रैव पृ. ६

३२. वाघमारे, भीमराव " पाणघळी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९९४, पृ. १८

३३. तत्रैव पृ. १०१

३४. वाघमारे प्र भीमराव " रानखळगी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९८८ पृ. १४

३५. तत्रैव पृ. ७१

३६. तत्रैव पृ. १५५

३७. तत्रैव पृ. १५८

३८. वाघचौरे, भीमराव " पाणघळी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती १९९४ पृ. ७

३९. तत्रैव पृ. ८

४०. तत्रैव पृ. २८

४१. तत्रैव पृ. ७४

४२. तत्रैव पृ. ९५

४३. वाघचौरे, भीमराव " रानखळगी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९८८ पृ. ६०

४४. तत्रैव पृ. ६७

४५. तत्रैव पृ. ६८

४६. तत्रैव पृ. ७४

४७. वाघचौरे, भीमराव " पाणघळी "
साकेत प्रकाशन, औरंगाबाद
प्रथमावृत्ती, १९९४ पृ. २८